# शेतात वीज करंट लावला आहे, कुणीही तिकडे जावू नये!

## गावागावात दवंडी ■ वाघाच्या भीतीने शेतकऱ्यांचा अघोरी निर्णय

**महासागर प्रतिनिधी**

**चिखलदरा,( दि.8 )** - मेळघाटमध्ये वाघाच्या हल्ल्यात गेल्या सहा महिन्यात सात बळी येथे वाघाची प्रचंड दहशत पसरलेली पहायला मिळत आहे. दिवसाढवळ्या रस्त्यावर अनेकांना वाघांचे दर्शन होत असल्याच्या अफवा वाऱ्यासारख्या पसरत असल्याने मेळघाटमध्ये विशेषत: चिखलदरा तालुक्यात बहुतांश नागरिकांनी दुचाकीने रात्रीचा प्रवास बंद केला आहे. इतकेच नाहीतर काही गावातील शेतकऱ्यांनी अघोरी निर्णय घेत



आपल्या शेताच्या तार कंपाउटमध्ये थेट जीवंत वीज प्रवाह सोडला असल्याची माहिती सुत्रांकडून मिळाली आहे, इतकेच नाही, तर 'शेतात वीज करंट लावाला आहे, कुणीही तिकडे जावू नये!' अशी लोकांना सतर्क करणारी दवंडीसुध्दा देण्यात आली आहे.

मेळघाट व्याघ्रप्रकल्प अंतर्गत राजदेव बाबा कॅम्प परिसरात आठ दिवसांपुर्वी वाघाने एका वनविभागाच्या रोजंदारी मजूराला ठार केले. विशेषत: चिखलदरा तालुक्यात पाच घटना तर धारणी तालुक्यात दोन घटना घडल्या आहेत. या प्रकारच्या घटना पूर्वी मेळघाटात क्वचितच घडत असत, परंतु मागील सात-आठ महिन्यांपासून वाघाच्या हल्ल्यांमध्ये सातत्याने वाढ झाली आहे. ही या सहा महिन्यातील सातवी घटना असल्याने मेळघाटातील जनता नरभक्षी वाघांमुळे भयभीत आहेत. अनेक शेतकऱ्यांनी दिवसा व रात्रपाळीलाही शेतातील सोकारी करणे बंद केले आहे. अन्य वण्यप्राण्यांच्या बंदोबस्ताकरिता थेट जीवंत वीज प्रवाह तार कुंपनामध्ये सोडण्यातयेत आहे. शॉक लागून यामध्ये कुण्या नागरिकाचा जीव जावू नये याकरिता गावागावात दवंडीसुध्दा दिली जात आहे, परंतू ही दवंडी ग्रामपंचायत देत आहे, की गावकरी स्वतऱ्हून देत आहे, हे स्पष्ट होवू शकले नाही. नागरिकांच्या मागणीनुसार, वन विभागाने या नरभक्षी वाघाला तत्काळ पकडून सुरक्षितपणे इतर ठिकाणी हलवावे अशी मागणी केली आहे.

# महावितरणच्या निष्काळजीपणाने तीन दुधाळ म्हशी ठार

## शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान; भरपाईची मागणी तीव्र

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर ( दि. 8 )** - अचलपूर तालुक्यातील वडगाव फत्तेपुर येथे महावितरणच्या निष्काळजीपणामुळे एक गंभीर घटना घडली असून दूध उत्पादक शेतकरी राजाजी शंकरजी येवले यांचे मोठे नुकसान झाले आहे. गावाजवळील जंगल परिसरात चरण्यासाठी गेलेल्या म्हशींचा विद्युत प्रवाहाने दुर्दैवी मृत्यू झाला.

रोहित्रावरील विद्युत वाहिनीचा तुटलेला तार जमिनीवर पडलेला असल्याने चरताना म्हशींचा त्या तारेला स्पर्श होताच तीन दुधाळ म्हशी जागीच ठार झाल्या. या घटनेत शेतकऱ्यांचे



तब्बल अंदाजे 2 लाख 25 हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. याशिवाय एक गाय व आणखी एक म्हैस गंभीर जखमी झाली आहे.

या अपघातानंतर परिसरातील शेतकरी व पशुपालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. गावकऱ्यांनी महावितरणच्या बेफिकीर कारभारावर कडक शब्दांत नाराजी व्यक्त केली. पशुपालक येवले यांनी तिन्ही मृत म्हशींच्या योग्य व तातडीच्या भरपाईची मागणी महावितरणकडे केली आहे. या दुर्घटनेबाबत महावितरण प्रशासन कोणती भूमिका घेतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दोन गणेश मंडळांची मिरवणुक रेंगाळली

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 8 )** - बडनेरा नवी वस्तीतील मोमिनपुरा येथे गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान वीर राणा गणेश मंडळ व बजरंग गणेश मंडळ यांचे कार्यकर्ते समोरासमोर आल्याने तेथील जामा मस्जिद समोर मिरवणूक रेंगाळली. यामध्ये पोलिसांच्या आदेशाचे उल्लंघन करून मंडळाचे कार्यकर्ते रेंगाळल्याने या प्रकरणी 7 जणांविरुद्ध बडनेरा पोलिसांत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. 6 सप्टेंबर रोजी एपीआय सुमेध सोनोने हे गणपती विसर्जन ड्युटीवर असताना रात्री 11.30 वाजता वीर राणा गणेश मंडळाचा गणपती जामा मस्जिदसमोर पोहोचला. त्यामागे बजरंग गणेश मंडळाची मूर्ती होती. पोलिसांनी परवानगीप्रमाणे मिरवणूक रात्री 12 वाजेपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. त्यावेळी पुढे जाण्यासाठी पोलिसांनी वारंवार सांगूनही वीर राणा मंडळाचे कार्यकर्ते पुढे न सरकता जामा मस्जिदजवळच रेंगाळले. यामुळे बजरंग गणेश मंडळाचा गणपती अडकला व परिस्थिती तणावपूर्ण झाली. याप्रकारामुळे महाराष्ट्र पोलीस अधिनियमात आयुक्तांनी जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्याने पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी संदीप रमेशराव शेळके, विवेक अनिल पवार, प्रमोद देवीदास लवाटे, बंडू महेंद्र सरोदे, गजानन बबनराव कदम, किशोर पवार, मिथुन सोळंके (सर्व रा. नवीवस्ती, बडनेरा) यांच्याविरुध्द बडनेरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

# गडगा नदीत वाहून गेलेल्या तरुणाचा मृतदेह 26 तासांनंतर सापडला

**महासागर प्रतिनिधी**

**धारणी ( दि. 8 )** - गडगा नदीत गणेश विसर्जनाच्या वेळी वाहून गेलेल्या तरुणाचा मृतदेह तब्बल 26 तासांच्या शोधमोहीमेनंतर सोमवारी सकाळी मिळाला. मृताचे नाव अनिल गणेश माकोडे (36, रा. कुसुमकोट) असे आहे. शनिवारी संध्याकाळी धुळघाट रोडलगत गडगा नदीत विसर्जनासाठी उतरलेल्या अनिल यांना नदीच्या जोरदार प्रवाहाने वाहून नेले. घटनेची माहिती मिळताच जिल्हा प्रशासन, डी.डी.आर.एफ. पथक व धारणी पोलीस यांनी शोधमोहीम सुरू केली. सुमारे 26 तासांच्या कठोर प्रयत्नांनंतर अखेर रविवारी सकाळी भोकरबर्ड्डी येथील देव घाट किनाऱ्यावर मृतदेह आढळला. या मोहिमेदरम्यान रेस्क्यू टीमच्या बोटीचेही नुकसान झाले, मात्र मोठी दुर्घटना टळली. मृतदेह नदीतून बाहेर काढून पोलीस उपस्थितीत धारणी उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. या घटनेमुळे कुसुमकोट व परिसरात हळहळ व्यक्त होत असून शोककळा पसरली आहे.

# झेरॉक्स सेंटरला आग; लाखोंचे नुकसान

## दर्यापूर तहसील कार्यालयासमोर भीषण दुर्घटना | अपंग व्यापारी संकटात

**दर्यापूर :** शहरातील तहसील कार्यालयासमोर असलेल्या झेरॉक्स सेंटरला सोमवारी पहाटे साडेदोनच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीत संपूर्ण दुकान जळून खाक झाले. या आगीत तब्बल सुमारे तीन लाख रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

ही आग श्रीकृष्ण महादेव सरोदे यांच्या झेरॉक्स सेंटरमध्ये लागली. पहाटे 2.45 वाजता अचानक पेट घेतलेल्या दुकानातील ज्वाळा एवढ्या प्रचंड होत्या की, नागरिकांना जवळ जाणे अशक्य झाले होते. तत्काळ नगरपरिषद अग्निशमन दल व पोलिसांना कळविण्यात आले. परंतु तोपर्यंत दुकानातील सर्व साहित्य जळून खाक झाले होते. या आगीत दोन झेरॉक्स मशीन, संगणक, लॅपटॉप, कलर प्रिंटर व झेरॉक्स पेपरचा साठा पूर्णपणे नष्ट झाला. या दुर्घटनेत सुमारे तीन लाखांचे नुकसान झाले असून सरोदे कुटुंबावर मोठे संकट कोसळले आहे. श्रीकृष्ण सरोदे हे अपंग असून त्यांनी काटकसर करून व अहोरात्र कष्ट करून हे दुकान उभे केले होते. एका मशीनपासून सुरू केलेल्या व्यवसायात त्यांनी हळूहळू इतर मशिनरी आणून व्यवसाय वाढवला होता. व्यवसायाला गती येत असतानाच ही दुर्घटना घडली. त्यामुळे सरोदे कुटुंब हतबल झाले असून त्यांना तातडीने मदतीची गरज आहे. आग लागण्याचे नेमके कारण समजू शकलेले नाही. ही घटना शॉर्टसर्किटमुळे घडली की अज्ञात इसमाने लावली, याचा तपास दर्यापूर पोलिस करत आहेत.

# 16 तास रांगेत राहून लावताहेत नंबर

## बांधकाम कामगारांना गृहपयोगी संच वाटपात गैरव्यवस्था - दाभा केंद्रावर चेंगराचेंगरीची परिस्थिती

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.9 )** - राज्य शासनाच्या योजना अंतर्गत बांधकाम कामगारांना गृहपयोगी संच वाटपाचे काम सुरु आहे. या संचाकरिता कामगारांना 16 तास रांगेत उभे राहून नंबर लावावा लागत आहे. येथे हजारोंच्या संख्येने कामगार लेकरंबाळांसह येत असल्याने येथे चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण होत आहे. सोबतच या वाटपामध्ये गंभीर गैरव्यवस्थापन उघड झाल्याचे कामगारांनी निदर्शनास आले आहे. अमरावती जिल्ह्यातील सर्व कामगारांना फक्त नादगाव खंडेश्वर तालुक्यातील दाभा या ठिकाणी बोलावण्यात येऊन वितरण केले जात असल्याने कामगारांना मोठा आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

जिल्ह्यात वेगवेगळ्या चार केंद्रावर संच वाटपाची मागणी असूनही, ऑनलाइन नोंदणी करताना केंद्र निवडण्याचा पर्याय असूनही प्रत्यक्षात फक्त दाभा येथेच संच वाटप सुरू आहे, असे



कामगारांचे संतप्त म्हणणे आहे. यामुळे 8 सप्टेंबर रोजी दाभा केंद्रावर प्रचंड गर्दी झाली होती. पोलीस बंदोबस्तही मोठ्या प्रमाणात लावण्यात आला होता, जणू काही आरोपींना फसवणूक करण्यासाठी वाटप करायचे असे वातावरण निर्माण झाले होते. या दिवशी पूर्वीच्या 3 व 4 सप्टेंबरच्या संच न मिळालेल्या कामगारांसह 8 सप्टेंबरच्या ऑनलाइन नोंदणी केलेल्या कामगारांचीही उपस्थिती होती. परिणामी, गर्दीवर नियंत्रण ठेवणे अवघड झाले व अनेकांना तासनतास ताटकळत उभे राहावे लागले. सूत्रांकडून माहिती मिळाल्याप्रमाणे, संच वाटपाचे कंत्राट एका खासगी ठेकेदाराकडे देण्यात आले असून तो ठेकेदार राज्यातील एका बड्या नेत्याचा जवळचा असल्याचे समोर आले आहे. यापूर्वीच्या कंत्राटात आर्थिक तोटा झाल्यामुळे, यावेळीही तोच व्यक्ती कामाचा ठेकेदार म्हणून नियुक्त करण्यात आल्याची चर्चा आहे. त्यामुळे संचाच्या गुणवत्तेतही घसरण झाल्याचेही संकेत दिले जात आहेत. एकाच केंद्रावर वाटप केल्याने अतिरिक्त खर्च वाचवण्यासाठी अशी व्यवस्था केल्याचा देखील आरोप आहे. कामगार संघटनांनी या प्रकरणाची न्याय्य चौकशी करण्याची ठाम मागणी केली आहे. सरकारने कामगारांचे हित लक्षात घेऊन तालुका स्तरावर सुलभ व न्याय्य वाटप व्यवस्था करावी, जेणेकरून गरजूंना वेळेवर व सोयीस्कर मार्गाने सुविधा मिळू शकेल, अशी प्रतिक्रिया बांधकाम कामगारांनी दिली आहे.

### मंत्री व आयुक्तांचा शुन्य प्रतिसाद

या गंभीर प्रकरणाच्या बाबतीत अमरावतीचे पालकमंत्री व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. तसेच, अमरावती जिल्ह्याच्या सहायक कामगार आयुक्त श्रद्धा वाघमारे यांच्याशीही संपर्क साधला असता त्यांनी प्रत्युत्तर दिले नाही. त्यामुळे या गंभीर प्रकरणाकडे लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसत आहे.

गृहउपयोगी संचाचे तालुका स्तरावर वितरण करण्याचे सुचविण्यात आले होते, तरीदेखील अधिकारी याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसत आहे. निवडणूक कामामुळे दिल्ली येथे असल्याने, परत आल्यावर संबंधित अधिकाऱ्यांना याचा योग्य जाब विचारण्यात येईल.



**बळवंत वानखडे,**
**खासदार, अमरावती लोकसभा.**



शासनाची ही योजना चांगल्या प्रकारे राबवली जाणे अत्यंत आवश्यक आहे. जिल्ह्यात एकाच ठिकाणी वाटप केंद्र असल्याने इतर तीन वाटप केंद्र लवकरात लवकर सुरू करावेत. एकाच केंद्रावर वाटप सुरू केल्यामुळे प्रचंड प्रमाणात गर्दी होते आहे. लवकरात लवकर इतर केंद्र सुरू केले नाही तर आम्ही बळाचा उपयोग करुन वितरण प्रक्रीया वठणीवर आणू.

**बच्चू कडू, प्रहार अध्यक्ष.**

# अमरावती जिल्ह्यात दोन अपघात, 12 जखमी तर एक ठार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 8 )** - अमरावती जिल्ह्यात सोमवारी दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या भीषण अपघातांनी हाहाकार माजवला. गणेश विसर्जनासाठी जात असलेले वाहन मार्डी गावाजवळ उलटून तब्बल 12 भक्त जखमी झाले, तर समृद्धी महामार्गावर ट्रक तपासण्यासाठी उतरलेल्या क्लिनरला मागून आलेल्या दुसऱ्या ट्रकने चिरडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.



## गणेश विसर्जनाला जाताना वाहन उलटले - 12 भक्त जखमी

गणेशोत्सवातील उत्साह शोकाकुल झाला, जेव्हा गणेश विसर्जनाला जात असलेले वाहन मार्डी येथील गोरखनाथ महाराज मंदिराजवळ भीषण अपघातग्रस्त झाले. या दुर्घटनेत तब्बल 12 भक्त गंभीररीत्या जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. छाया कॉलनी (पार्वती नगर) येथील अष्टविनायक गणेशोत्सव मंडळाने दहा दिवसांचा उत्सव साजरा केल्यानंतर सोमवार, 8 सप्टेंबर रोजी गणेश विसर्जन यात्रा वर्धा नदीकडील कौंडण्यपूर नेली होती. मंडळाचा गणेश महिंद्र पिकअपमध्ये ठेवून मंडळाचे कार्यकर्ते व महिला-पुरुष मिळून 10 ते 12 जण गाडीतून निघाले होते. दुपारी साधारण 2 वाजता मार्डी गावाजवळील गोरखनाथ महाराज मंदिराजवळील तीव्र





वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि गाडीने तीन ते चार पलट्या घेतल्या. यात वाहनातील सर्व जण जखमी झाले. तसेच गणेश मूर्तीही तुटली. तत्काळ ग्रामस्थ, पोलीस आणि मंडळाचे कार्यकर्ते घटनास्थळी धावले. जखमींना प्रथम मार्डीच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले, त्यानंतर सर्वांना अमरावती जिल्हा रुग्णालयात



हलविण्यात आले. काही महिलांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांना आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच युवा सेनेचे नेते राहुल माटोडे यांनी थेट रुग्णालय गाठून जखमींच्या उपचारासाठी प्रशासनावर पाठपुरावा केला. पोलिसांनी कळवले की, या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. दरम्यान, मंडळातील भक्तांच्या मदतीने आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने गणेश मूर्तीचे विसर्जन मार्डी तलावात करण्यात आले.

## पंचर टायर तपासण्यासाठी उतरलेला क्लिनर ट्रकखाली चिरडला

समृद्धी महामार्गावर सोमवारी पहाटे भीषण अपघात घडला. टायर पंचर तपासण्यासाठी ट्रकचालकाने थांबवलेल्या गाडीतून उतरलेला क्लिनर मागून आलेल्या दुसऱ्या ट्रकखाली चिरडला गेला. या अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना तलेगाव पोलीस ठाणे क्षेत्रातील अमरावती आयसी-07 समृद्धी महामार्ग, गावनेर-तलेगाव मुंबई कॉरिडोर, चॅनल नं.120+300 वर पहाटे घडली. मृतकाचे नाव खिजर खान सलीम खान (20, पठानवाडी, ब्राह्मणपूर, मध्यप्रदेश) असे आहे. ट्रक (क्र. एमपी 68/झेडडी3623) चालक फरदीन खान फजल खान (24) हा नागपूरवरून जालनाकडे जात असताना



टायर फूटल्याचा आवाज आला. त्याने क्लिनर खिजर खानला खाली उतरवून टायर तपासण्यास सांगितले. त्याचवेळी मागून आलेल्या अज्ञात वेगवान 12 चाकी ट्रकने जोरदार धडक दिली. अपघात एवढा भीषण होता की क्लिनरचे शरीर क्षतविक्षत झाले. घटनेनंतर महामार्ग पोलिसांनी धामणगाव रेल्वे महामार्ग केंद्राच्या मदतीने मृतदेह उचलून धामणगाव रुग्णालयात हलवला. पुढील तपास तलेगाव पोलीस करीत आहेत. ही कारवाई महामार्ग पोलिस केंद्राचे प्रभारी पीआय विशाल पोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली संतोष गहरवाल, नागेश दीपके, सूरज गायकवाड व ठाणेदार किरण औटे यांच्या पथकाने केली.

# मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देण्याचा शासन निर्णय रद्द करा!



### महात्मा फुले समता परिषदेचे निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.8 )** - अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या अमरावती जिल्हा शाखेने, मराठा आरक्षण उपसमितीच्या शिफारसीवर आधारित, ओबीसी आरक्षणात मराठा जातीचा समावेश करण्याचा राज्य शासन निर्णय रद्द करण्यासाठी निवेदन दिले आहे. हे निवेदन जिल्हाधिकारी अमरावती यांना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, हैदराबाद गॅझेटच्या नावावर ओबीसी समाजाची दिशाभूल करत, वंशावळीचे आणि कुलाचे नाव घेऊन मराठा जातीला ओबीसी वर्गात समाविष्ट करण्याचा निर्णय उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या स्पष्ट निर्णयांचे उल्लंघन करणारा आहे. त्याचप्रमाणे, शासनाने दोन सप्टेंबरच्या हैदराबाद गॅझेटच्या कलमाद्वारे हे नियमबाह्य कलम शासन निर्णयात सामील करून ओबीसींची फसवणूक केली आहे. महात्मा फुले समता परिषदेच्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, मराठा हे कुणबी नाहीत आणि त्यांना ओबीसी आरक्षणात समाविष्ट करण्याची प्रक्रिया राज्यात कधीच मान्य होणार नाही. त्यामुळे या कलमासंदर्भातील निर्णय रद्द करून पूर्वीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचे पालन व्हावे. निवेदनात महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री आणि ओबीसींचे राष्ट्रीय नेते छगन भुजबळ यांची देखील विशेष नोंद करण्यात आली आहे. त्यांनी ओबीसी आरक्षण कायदा अबाधित रहावा, अनधिकृत प्रगत जातींची बेकायदेशीर घुसखोरी होऊ नये यासाठी कठोर संघर्ष करत आपले राजकीय अस्तित्व पणाला लावले आहे. तरीही मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण दिले जावे अशी त्यांची भूमिका आहे. निवेदनात अधोरेखित केले आहे की, राज्यातील ओबीसी, एससी व एसटी समाजाच्या हितासाठी आणि संविधान विरोधी व झुंडशाहीला बळ न देता, शासनाने हा विवादित निर्णय कायमचा रद्द करून मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण द्यावे असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी अमरावती यांना निवेदन देताना अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद अमरावती जिल्हा अध्यक्ष नंदकिशोर लेकुरवाळे, महानगर अध्यक्ष अशोकराव दहिकर, प्रदेश सचिव डॉ. गणेश खारकर, प्रदेश सदस्य या बाबुरावजी बेलसरे, राजाभाऊ हाडोळे, ॲड. प्रभाकर वानखडे, तृप्ती वाट, सोनाली नवले, संजय वर्हेकर, अशोकराव ठोंबरे, सागर पाटील, नितीन राऊत, सतीश लेकुरवाळे, गजानन बोबडे, देवेंद्र गोरडे, हर्षल वाट, महेंद्र भातकुले, ओंकार ठाकरे, स्वप्निल आजनकर, संजय ठेवले, कृष्णराव आजनकर, गजानन झगडे, तुषार खवले, निलेश आघाडे, विजयराव कांडलकर इत्यादी हजर होते.


Kausalya Shrungare Education Foundation's
**Vidyaniketan College of Pharmacy**
**Anjangaon Surji**
(Approved by PCI, DTE & DBATU)

**ADMISSION NOTICE**
(Direct Second Year B. Pharmacy) 2025-26

Applications are invited from the eligible candidates for the admission to Direct Second Year B. Pharmacy course against the vacant seats (Against CAP quota) after CAP rounds.

Eligibility: As per the norms prescribed by Government of Maharashtra.

**Admission Schedule 2025-26**

| S. No. | Activity | Date |
|---|---|---|
| 1 | Last date of acceptance of application | 10/09/2025 |
| 2 | Display of provisional merit list | 11/09/2025 (11.00 am) |
| 3 | Submission of grievance (if any) | 11/09/2025 (2.00 pm) |
| 4 | Display of final merit list | 11/09/2025 (5.00 pm) |
| 5 | Admission round for all categories | 12/09/2025 |
| 6 | Confirmation of admission by paying fees | 12/09/2025 (up to 5.00 pm) |

Principal



आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजुला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# वेगवान विकास; वीज खांब न हटवताच रस्ता पूर्ण

## रस्त्याच्या मधोमध असलेला खांब देतोय अपघाताला आमंत्रण



**महासागर प्रतिनिधी**

**वरूड, (दि. 8)**- कधी कधी शहरातील विकास इतका वेग पकडतो की, मधात जे येईल त्याला तुडवून कामे पुर्ण केली जाते. तर कधी कधी हीच कामे फक्त कागदोपत्री दाखविली जातात. शहरात सध्या काँक्रीट रस्त्यांच्या बाबतीत इतका वेगवान विकास पाहिल्या जात आहे जो नागरिकांच्या जीवाशी खेळणारा ठरत आहेत. याचेच ताजे उदाहरण म्हणजे शहरातील मुख्य रस्त्यावर विद्युत खांब न हटवता रस्त्याचे कॉंक्रिटीकरण उरकण्यात आले. या धाडसी पण बेफिकीर कामामुळे प्रशासनाच्या नियोजन क्षमतेवर आणि जबाबदारीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

रस्त्याच्या मधोमध उभा असलेला खांब हा नागरिकांसाठी मृत्यूचा सापळा ठरू शकतो. दिवसेंदिवस वाढणारी वाहतूक, वेगवान दुचाकी आणि चारचाकी यामुळे या खांबावर अपघात होणे अनिवार्य आहे. तरीदेखील वीज वितरण कंपनी आणि नगरपरिषद बांधकाम विभागाने एकमेकांवर जबाबदारी ढकलत हे काम पूर्ण केल्याची चर्चा सुरू आहे.

जनतेच्या पैशातून विकासकामे होतात, पण ती कामेच जीवघेणी ठरणार असतील तर आम्हाला अशा विकासाची गरज नाही, असा संतप्त स्वर नागरिक व्यक्त करत आहेत. प्रशासनाचे निष्काळजी धोरण आणि ठेकेदारांच्या मनमानीमुळे रस्त्याचा उपयोग करण्याऐवजी नागरिकांना जीव धोक्यात घालावा लागत असल्याचे चित्र आहे.

याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देऊन रस्त्यातील खांब त्वरित हटवावा, तसेच दोषी ठेकेदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी नागरिकांची ठाम मागणी आहे. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# सततच्या पावसामुळे संत्रा, कपाशी, सोयाबीन,भाजीपाल्याचे मोठे नुकसान





**महासागर प्रतिनिधी**


**चांदूर बाजार, (दि. 8)** - जिल्ह्याच्या अनेक भागांत गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. विशेषत: संत्रा, कपाशी, सोयाबीन तसेच भाजीपाला पिकांवर याचा विपरित परिणाम झाला आहे. शेतकऱ्यांचे उत्पादन घटण्याची भीती व्यक्त होत आहे. काही भागांत पिके सडली असून काही ठिकाणी कीड व बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे.

अमरावती, अचलपूर, चांदूर बाजार,वरुड आणि मोर्शी तालुक्यात संत्रा बागा मोठ्या प्रमाणात आहेत. परंतु सततच्या पावसामुळे संत्र्याच्या मुळांजवळ पाणी साचले असून त्यामुळे झाडे सडू लागली आहेत. फळांच्या सालीवर काळे डाग दिसू लागले आहेत. यामुळे निर्यातीयोग्य फळांचे प्रमाण घटले आहे. संत्रा उत्पादक शेतकरी अण्णा पाटील म्हणाले, दोन महिने मेहनत घेऊन झाडांना खत, औषधं दिली. पण आता पाणीच पिकं घेऊन जातंय. शासनाने मदत करावी.

जिल्ह्यांतील कपाशी उत्पादक भागात पावसामुळे पिकांवर बोंडअळीचा प्रादुर्भाव वाढला आहे. पाण्यामुळे औषध फवारणीचा प्रभाव कमी होतो आहे. काही शेतकऱ्यांनी फवारणी ची वेळ पुन्हा लागली आहे. कपाशी उत्पादक अमरावती जिल्ह्यांत चांदूर बाजार अचलपूर या भागात सोयाबीन हे पिक आहे. मात्र, या भागात जोरदार पावसामुळे सोयाबीनची शेंग सडू लागली आहे. पिकाच्या मुळाशी पाणी साचून त्याचा पिवळसर रंग येतो आहे. काही ठिकाणी 30-40 टक्के नुकसान झाल्याचे प्राथमिक अंदाज आहेत. सततच्या पावसामुळे टोमॅटो, वांगी, कारली, मिरची यांसारख्या भाजीपाला पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. जिल्ह्यातील अनेक भागात जमीन ओलसर राहिल्यामुळे पिके कुजू लागली आहेत. बाजारात भाजीपाल्याचे दर वाढू लागले असून पुरवठा कमी झाल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. या सततच्या पावसामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. उत्पादन कमी होणार असल्याने कर्जफेडीचा प्रश्न उभा राहिला आहे.त्या सरकार कर्जमाफी वरून घुमजाव करत आहे.शेतकरी संघटनांनी शासनाकडे त्वरित पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.

# चांदूर रेल्वे शहरात विजांचा तुफान कडकडाट

## कारमोरे कुटुंबीयांच्या घरावर कोसळली विज, सुदैवाने बचावले कुटुंब



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, (दि. 8)**- शनिवारी रात्री 8.30 ते 9 च्या सुमारास चांदूर रेल्वे शहरावर अचानक आलेल्या वादळी हवामानासह विजांचा तुफान कडकडाट झाला. शहरातील अनेक भागात एकामागोमाग एक वीजा कडाडत होत्या. या अचानक घडलेल्या नैसर्गिक तडाख्यामुळे नागरिक भयभीत झाले.

सदर विजांचा जोर इतका प्रचंड होता की, शहरातील मंगलमुर्ती नगरातील रामदास कारमोरे यांच्या घरावर वरच्या भागावर थेट विज कोसळली. याचा मोठा आवाज परिसरात घुमला. परंतु सुदैवाने या कुटुंबीयांची जीवितहानी झाली नाही. जेथे विज पडली तेथील थोडा भाग तुटून खाली पडला. या विजेमुळे त्यांच्या घरातील काही इलेक्ट्रिकल साहित्यांचे नुकसान झाले.

दरम्यान, शहरातील विविध वस्त्यांमध्ये या विजांचा तडाखा बसल्याने अनेक घरांतील विविध इलेक्ट्रिकल उपकरणे अचानक बंद पडल्याची प्राथमिक माहिती आहे. या विजेचा मोठा फटका स्थानिक केबल ऑपरेटर यांना बसला असून त्यांचे ॲम्प्लिफायर व इतर अनेक इलेक्ट्रॉनिक्स वस्तू निकामी झाले. या घटनेनंतर नागरिकांमध्ये संभ्रम व भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पुढील काही दिवस ढगाळ वातावरण कायम राहण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे. नुकसानग्रस्त नागरिकांनी मदतीची मागणी केली आहे.

# शिवाजी उच्च माध्यमिक शाळेची विभागीय स्तरावर घोडदौड

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, (दि. 8)** - क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अमरावतीच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय शालेय सेपाक टकरा स्पर्धा नुकतीच विभागीय क्रीडा संकुल अमरावती येथे संपन्न झाली. या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शाळांचे संघ भाग घेतले होते. शिवाजी उच्च माध्यमिक शाळा मोर्शीचा 14 वर्ष वयोगटातील मुलींचा संघ विजयी होऊन पुढील टप्प्यातील विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. संघातील प्रमुख खेळाडू स्वरा तराळ, रिया हरले, अक्षरा साबळे, निधी कांडलकर आणि निर्मिती नीचत यांनी उत्कृष्ट कामगिरी सादर केली. तसेच, 17 व 19 वर्ष वयोगटातील मुले व मुलींच्या संघांनी जिल्हास्तरीय स्पर्धेत उपविजेतेपद पटकवलं. शाळेचे प्रमुखाध्यापक एस.



आर. देशमुख, उपमुख्याध्यापक एम. बी. ढाकुलकर, पर्यवेक्षक वि.टी.नवरे, तसेच क्रीडा शिक्षक श्री. विजय तारापुरे, अजय हीवसे, मनीष मोरे, प्रतीक उगले, अभिजीत देशमुख आणि अतुल वैद्य यांनी सर्व विजयी खेळाडूंचं मनापासून अभिनंदन केलं.शिवाजी उच्च माध्यमिक शाळा मोर्शीच्या या यशाने शालेय क्रीडा क्षेत्रात एक नवा आदर्श निर्माण केला असून, पुढील स्पर्धेसाठी सर्वांचे मनोबल अधिक प्रगल्भ झाले आहे.

# नूतन ठाकरे यांच्या प्रेरणादायी व्याख्यानाने विद्यार्थ्यांमध्ये नवा उत्साह

**अमरावती** - शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती (स्वायत्त संस्था, महाराष्ट्र शासन) मध्ये प्रवेश कार्यक्रम 2025-26 अंतर्गत दिनांक 6 सप्टेंबर 2025 रोजी विद्यार्थ्यांसाठी नूतन ठाकरे यांचे प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यशाळा सभागृहात सकाळी 10.30 ते 11.30 या वेळेत कार्यक्रम पार पडला. विद्यार्थ्यांसह शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नूतन ठाकरे यांना 10 वर्षांहून अधिक अध्यापनाचा अनुभव असून, VERTEX मार्गदर्शन संस्था यांच्या संचालक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन देण्याचे कार्य करत आहेत. त्यांनी अभियांत्रिकी क्षेत्रातील (इलेक्ट्रॉनिक्स आणि सिस्टिम संवाद) मध्ये पदव्युत्तर शिक्षण (एम.टेक) पूर्ण केले असून सुवर्णपदक प्राप्त केले आहे. त्यांनी राष्ट्रीय प्रवेश परीक्षा आणि GC-NET परीक्षांमध्ये सर्वोच्च टक्केवारी मिळवली आहे. VLSI, समाविष्ट प्रणाली आणि सूक्ष्मयंत्र अनुप्रयोगांमध्ये संशोधन करत आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक जर्नल्स आणि आयईईई परिषदांमध्ये लेख प्रकाशित केले आहेत. व्याख्यानादरम्यान त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करत सांगितले




की, ज्ञान म्हणजे फक्त गुणांपुरते मर्यादित नसून जिज्ञासा, चिकाटी आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर आपण कोणतीही अडचण पार करू शकतो. प्रत्येक संधीला यशाची पायरी बनवा आणि शिकण्याची प्रक्रिया कधीही थांबवू नका. कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक ज्ञान नव्हे, तर आत्मप्रेरणा, सकारात्मक दृष्टिकोन आणि संशोधन क्षेत्रात पुढे जाण्याचे प्रोत्साहन मिळाले. प्रवेश कार्यक्रम समिती, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले, विद्यार्थ्यांनीही अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# आधार नसल्याने 13 लाख विद्यार्थी वंचित?

## शालेय शिक्षण विभागाचा मोठा निर्णय

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 8)** राज्यभरातील शालेय शिक्षण घेत असलेल्या एकूण 2 कोटी 04 लाख 63 हजार 392 विद्यार्थ्यांपैकी 93.51 टक्के विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण झाले असून, तरीही तब्बल 13 लाखांहून अधिक विद्यार्थी आधार कार्डाच्या समस्येमुळे वंचित आहेत. शालेय शिक्षण विभागाने भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (यूआयडीएआय) च्या सहकार्याने विशेष शिबिरांचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला आहे, जेथे विद्यार्थ्यांच्या आधार प्रमाणीकरणाचा प्रयत्न करण्यात येणार आहे. आधार कार्ड नसल्यामुळे राज्यातील 5 लाख 27 हजार 602 विद्यार्थ्यांकडे आधारच नसल्याचे उघड झाले आहे. त्याचबरोबर 7 लाख 37 हजार 485




विद्यार्थ्यांचे आधार कार्ड अवैध असल्याची नोंद आहे. या विद्यार्थ्यांच्या आधार प्रमाणित करण्यासाठी आणि माहितीतील विसंगती दूर करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने विशेष मोहीम सुरू केली आहे. सरकारच्या 100 दिवसांच्या कृती कार्यक्रमांतर्गत हे काम प्राधान्याने करण्यात येत आहे.

प्रत्येक शाळेवर दोन आधार संच (816 एकूण) उपलब्ध करून देण्यात आले आहेत, जिथे विद्यार्थ्यांचे नवीन आधार कार्ड तयार करणे, दुरुस्ती करणे व त्यांचे प्रमाणीकरण करणे सुरू आहे. यूआयडीएआयच्या निर्देशानुसार बायोमेट्रिक माहिती पाचवी आणि पंधराव्या वर्षी अद्ययावत करणे अत्यावश्यक आहे, अन्यथा आधार अवैध ठरू शकतो. त्यामुळे शालेय शिक्षण आयुक्तांनी राज्यभरात शिबिरे आयोजित करणे आवश्यक असल्याचे निर्देश दिले आहेत. आधार कार्डाचे प्रमाणीकरण होत नसेल, तर संबंधित विद्यार्थी पटसंख्येबाहेर राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे शालेय शिक्षण विभागाने आता आधार अद्ययावत करण्याची प्रक्रिया शाळांमधून शिबिरांच्या माध्यमातून वेगाने पूर्ण करण्याचे ठरवले आहे. यामुळे शाळांमधील विद्यार्थ्यांची माहिती यूडायस-प्लस प्रणालीवर संकलित होणार असून, त्याचा उपयोग विविध विद्यार्थी लाभ योजनांशी जोडण्यासाठी केला जाईल. अद्याप 63 हजार 9 विद्यार्थ्यांची आधार पडताळणी प्रलंबित असून, या विद्यार्थ्यांमुळे शाळा व शासन यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. आता विशेष शिबिरे आयोजित करून माहितीतील विसंगती दूर केली जाणार आहे. त्यामध्ये आधार क्रमांकाची नोंदणी, दुरुस्ती तसेच आधारकार्ड नसलेल्या विद्यार्थ्यांना नवीन आधार जारी करण्यावर भर देण्यात येत आहे. हे शिबिरे राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या हितासाठी असून, शासनाच्या वतीने चालवण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत.

# शिक्षकांची आंतरजिल्हा बदली प्रक्रिया सुरु करा!



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 8)** राज्यातील जिल्हा परिषदांतर्गत कार्यरत प्राथमिक शिक्षकांची संगणकीय आंतरजिल्हा बदली प्रक्रिया मागील तीन वर्षांपासून रखडली आहे. त्यामुळे सुमारे 12 हजार शिक्षक आपले स्वगृह जिल्हा सोडून कोसळलेले जिल्हा परिषदांमध्ये दूरवर कर्तव्य बजावत आहेत. प्रहार शिक्षक संघटनेच्या वतीने ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आणि प्रधान सचिव यांना निवेदन सादर करून आंतरजिल्हा बदली प्रक्रिया तत्काळ सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

2017 पासून सुरू झालेली संगणकीय आंतरजिल्हा बदली प्रक्रिया 2022 पर्यंत सहा टप्प्यांत शासनाने यशस्वीरीत्या राबविली. संघटनेच्या सततच्या प्रयत्नांनी राज्यातील 12500 शिक्षकांच्या स्वगृह जिल्ह्यात बदली झाली. परंतु, गेल्या तीन वर्षांपासून आंतरजिल्हा बदली प्रक्रिया राज्यस्तरावरून स्थगित होत आहे. त्यामुळे शिक्षकांमध्ये रोष व असंतोष वाढला आहे.

सर्व जिल्हा परिषदांनी शिक्षक संवर्गाचे रोस्टर तातडीने व कालमर्यादित अद्यावत करावे, पेसा क्षेत्रात 20टक्के पदे स्थानिक अनु. जमातीसाठी व नॉन-पेसा क्षेत्रात 80 टक्के पदे इतर प्रवर्गासाठी आरक्षित करून रिक्त दाखवावे, प्रतीक्षेत असलेल्या शिक्षकांची जिल्हानिहाय यादी तातडीने प्रदर्शित करावी अथवा राज्यस्तरीय प्रतीक्षा यादी जाहीर करावी, उर्दू माध्यम शिक्षकांची विशेष आरक्षण योजना लागू करावी, आंतरजिल्हा बदलीसाठी स्वतंत्र वेळापत्रक जाहीर करावे, 31 डिसेंबर 2025 रोजी अस्तित्वात असलेले रिक्त पद समाविष्ट करावे.अशी मागणी करण्यात आली.

### अन्यथा राज्यस्तरीय आंदोलन



मागील तीन वर्षांपासून बदली प्रक्रिया रखडली असून शिक्षकांच्या न्याय हक्कासाठी संघटनेच्या वतीने राज्यस्तरीय आंदोलन करावे लागेल. जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर आंदोलन करण्यात येईल, असे प्रहार शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी स्पष्ट केले आहेत.

# सुविधा नसतील, तर टोल फोडू!

## बच्चू कडूंचा इशारा ■ हैदतपूर टोल वाद उफाळला

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर बाजार, (दि. 8)** - परतवाडा मार्गावरील हैद्तपूर येथे नुकतेच उभारण्यात आलेले टोल नाके सध्या वादाच्या भोवऱ्यात अडकले आहे. रस्त्याची कामे अद्याप पूर्ण न झालेली असताना लाखो रुपयांचा टोल वसूल करण्याच्या हालचालींना स्थानिक नागरिकांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे असून, त्यात केवळ मुरूम टाकून तात्पुरता उपाय करण्यात आला आहे. त्याशिवाय पायाभूत सुविधा, सुरक्षितता व वाहतूक नियोजन या बाबींकडे अजूनही दुर्लक्ष झाले आहे.



या पार्श्वभूमीवर बच्चू कडू यांनी पुढाकार घेत थेट राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला पत्र लिहिले असून, त्यांनी आपली ठाम भूमिका मांडली आहे. रस्त्याचे काम, विशेषत: पुलाचे बांधकाम पूर्ण न होता, कोणत्याही प्रकारे टोल सुरु करण्यात येऊ नये. नागरिकांच्या सोयी-सुविधा पूर्ण झाल्याशिवाय टोल घेणे अन्यायकारक आहे, असा कडवट इशारा त्यांनी दिला आहे. जर हा टोल जबरदस्तीने सुरु करण्यात आला, तर 'टोल फोड' आंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशारा देखील त्यांनी दिला आहे.

स्थानिक जनतेत यामुळे संतापाची लाट उसळली असून, अपूर्ण रस्त्यांवर प्रवास करताना होणाऱ्या त्रासांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. पावसाळ्यात रस्त्यांची अवस्था अधिकच बिकट होते. त्यामुळे अशा परिस्थितीत टोल घेणे म्हणजे जनतेच्या खिशावर अतिरिक्त भार टाकणे असल्याची भावना आहे. काही ठिकाणी नागरिकांनी शांततेत





आंदोलन सुरू केले असून, त्यांनी टोल सुरु झाल्यास तीव्र विरोध करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. या संपूर्ण वादात आता प्रशासन काय भूमिका घेते आणि बच्चू कडू यांच्या इशाऱ्याला कितपत गांभीर्याने घेतले जाते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. टोल सुरू करण्याआधी अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्यात येतील का, नागरिकांना अपेक्षित सुविधा मिळतील का? हे प्रश्न आता पुढील काही दिवसांतील घडामोडींवर अवलंबून आहे.

दरम्यान, बच्चू कडू हे विदर्भातील जनतेच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेणारे नेते म्हणून ओळखले जातात. त्यामुळे त्यांच्या इशाऱ्यामुळे टोल प्रशासकीय यंत्रणेसाठी डोकेदुखी ठरू शकतो. नागरिकांचा रोष आणि राजकीय दबाव या दोघांच्या पार्श्वभूमीवर टोल प्रकरणाची पुढील दिशा ठरणार आहे.




# श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल सभोवताली बोर ब्लास्टिंग बंद करा!

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, (दि. 8)** साने गुरुजी मानव सेवा संघ चालवित असलेल्या श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलच्या परिसरातील मार्डी रोड, मौजे मासोद येथे सध्या खदान पट्ट्यांवर मोठ्या प्रमाणात बोर ब्लास्टिंग केले जात आहे. संबंधित खदान धारक 50 ते 100 मिमी व्यासाचे होल करून जोरदार ब्लास्टिंग करत आहेत. त्यामुळे हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना आणि विशेषत: हार्टचे रुग्णांना गंभीर अस्वस्थता व हादरे बसत आहेत. यामुळे रुग्णांचे जीव संकटात येण्याची शक्यता आहे. हॉस्पिटल प्रशासन, पदाधिकारी व डॉक्टरांनी या गंभीर समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन दि. 29 रोजी पालकमंत्री श्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे बोर ब्लास्टिंग पूर्णपणे बंद करण्याची मागणी केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी व त्यांच्या आरोग्याच्या रक्षणासाठी तत्काळ कारवाई आवश्यक आहे. प्रशासनाने तसेच खान धारकांनी हॉस्पिटल परिसराजवळून ब्लास्टिंग करणे बंद करावे, अन्यथा गंभीर परिणाम संभवतात, असा इशारा दिला आहे.



## जाहीरनामा

**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती**

**श्री. एस.बी. कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्रमांक १७४३/२०२५**

**मंगलाबाई वि. निरंक**

**पुढिल तारीख २२.०९.२०२५**

**अर्जदार :-** १. मंगलाबाई अशोकराव तिडके, वय ६७ वर्ष, व्यवसाय- घरकाम, २. विनोद अशोकराव तिडके, वय ४० वर्ष, व्यवसाय- मजुरी, ३. रितेश अशोकराव तिडके वय ३६ वर्ष व्यवाय मजुरी, सर्व रा. गाडगेबाबा मंदिर संतोष भवन गल्ली नं. १ व्ही.टी.सी. अमरावती

**विरूद्ध**

**गैरअर्जदार- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत अशोक भाऊरावजी तिडके दि. १६.१०.२००९ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार मंगलाबाई अशोकराव तिडके व इतर यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा मंगलाबाई अशोकराव तिडके व इतर वरीलप्रमाणे सदर्हू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिद्धीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदर्हू मुदतीत कोणी हरकत न दाखविल्यास सदर्हू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हकक साबित दिल्यास त्यांना सदर्हू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०३.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती**



# वरिष्ठांच्या आदेशाला केराची टोपली!

## अचलपूरचे बीडिओ भ्रष्टाचारी ग्रामसेवकांची करतात पाठराखण?

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, (दि. 8)** - गौरखेडा कुंभी ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचाराचे ढग दिवसेंदिवस अधिकच गडद होत आहेत. माहिती अधिकार अधिनियमांतर्गत एका नागरिकाने ग्रामपंचायत कार्यालयातून संबंधित माहिती मागवली असता, त्यास नकार दिला गेला. नागरिकाने प्रथम अपील गटविकास अधिकारी पंचायत समिती अचलपूर यांच्याकडे केली. त्यावर बीडिओंनी सात दिवसांत माहिती पुरवावी असे स्पष्ट आदेश दिले होते. मात्र, ग्रामपंचायत अधिकारी हे आदेश पायदळी तुडवत माहिती न देता प्रकरण थांबवत आहेत.

याच प्रकरणात ग्रामसेवकाविरोधात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडेही तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांनी चार ते पाच महिन्यांपूर्वी बीडिओ अचलपूर यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते.




परंतु, आजतागायत बीडिओंनी या आदेशाकडे दुर्लक्ष करत कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला असून वरिष्ठांचे आदेश बीडिओ मानतात की नाही? असा सवाल जोरात विचारला जात आहे.

माहिती अधिकार कार्यकर्त्याने अखेर माहिती आयोग, खंडपीठ अमरावती येथे द्वितीय अपील दाखल केली आहे. याचबरोबर पुन्हा एकदा पंचायत समिती अचलपूर कार्यालयात अर्ज दाखल करून उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायतांनी दिलेल्या पत्रानुसार आजपर्यंत कोणती कारवाई करण्यात आली आहे, याची विचारणा करण्यात आली आहे.

गौरखेडा कुंभी ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचार व भ्रष्ट ग्रामसेवकांच्या वावरामुळे प्रशासनाच्या निष्क्रियतेवर नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. तसेच, उच्चस्तरीय अधिकारी व सरकारने तत्काळ कारवाई करून प्रकरणाची दखल घेण्याची मागणी करण्यात येत आहे.

